महाराष्ट्र शासन - आरोग्य सेवा

# आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, पुणे

| | | |
|---|---|---|
| जिल्हा आरोग्य अधिकारी<br>दुरध्वनी क्रमांक (वै)<br>कार्यालय दुरध्वनी क्र. | 26051418<br>26129965 | आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, पुणे-१.<br>ईमेल आयडी : dhopune@gmail.com |

**दिनांक :- २५/०७/२०२३.**

**प्रति,**

**सर्व अर्जदार**

**विषय :- राआअ अंतर्गत विविध २७ संवर्गाची पात्र/अपात्र उमेदवारांची यादी जाहिर करणेबाबत.**

उपरोक्त विषयान्वये राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत विविध पद भरतीकरीता दिनांक ०२.११.२०२२ रोजी पुण्यनगरी दैनिक वृत्तपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती.

सदर जाहिरातीनुसार प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करण्यात आलेली असुन २५ संवर्गाचे ((अतिविशेषतज्ञ, स्त्री रोग तज्ञ, बालरोगतज्ञ, भुलतज्ञ (अनेस्थेटिक), सर्जन, फिजिशिअन, सायकाट्रिस्ट, ऑर्थोपेडिक, इएनटी सर्जन, मायक्रोबायोलॉजिस्ट, वैद्यकिय अधिकारी (एमबीबीएस), सायकोलॉजिस्ट, वैद्यकिय अधिकारी (आयुष पी.जी), वैद्यकिय अधिकारी (आयुष यु.जी), वैद्यकिय अधिकारी (आरबीएसके), इन्स्ट्रक्टर फॉर हिअरींग, ऑडिओलॉजिस्ट ॲण्ड स्पीच थेरपिस्ट, फिजिओथेरपिस्ट, समुपदेशक, ब्लड बॅक टेक्निशिअन, डायलिसिस टेक्निशिअन, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, डेंटल हायजनिस्ट, तांत्रिक समन्वयक (एचडब्ल्युसी हब) )) या संवर्गाची पात्र अपात्र यादी तयार करण्यात आलेली आहे. एकुण २७ संवर्गापैकी रेडिओलॉजिस्ट व डेंटल टेक्निशिअन या दोन पदांकरीता अर्ज प्राप्त झालेले नसुन २५ संवर्गाची पात्र अपात्र यादी प्रसिध्द करण्यात येत आहे.

तरी सदर पात्र अपात्र यादी बाबत उमेदवारांचे काही आक्षेप किंवा हरकत असल्यास दिनांक ३१.०७.२०२३ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत या कार्यालयात सादर करावे. उशिरा प्राप्त झालेल्या आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही.

संबंधित उमेदवारांना सुचित करण्यात येते की, यापुढील सर्व भरतीसंदर्भातील माहिती ही वेळोवेळी जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर (zppune.org)या संकेतस्थळावर उपलब्ध केली जाईल. वैयक्तिकरित्या (ई मेल किंवा फोनद्वारे) कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, पुणे**